# **दांभिक**

तुला आदरीले त्याला अवमानीले
तुला गुरू केले त्यां गुरुं बनविले ||१||

तुझा गंडा बांधला त्याला गंडा घातला
तुझा पिटला डांगोरा त्याचा फोडला ||२||

तुला नित्य पुजले त्याला सदा निंदले
तुला माथी धरले त्याला लाथी मारले ||३||

म्हणू दे म्हणून मला क्रूरकर्मा
वाटते मला परी मी न्यायकर्ता ||४||

– नारायण
०८/०९/२३